# समभाग निधी योजना
# (Equity Grant Scheme)

शेतकरी उत्पादक कंपनीस आर्थिक स्थैर्य देण्याच्या उद्देशाने उत्पादक कंपनीतील समभाग धारक (शेअर होल्डर) शेतक-यांना त्यांच्या समभाग भांडवला इतक्याच रकमेचे निधी (Equity Grant) उपलब्ध करुन देण्याकरीता समभाग निधी योजना (Equity Grant Scheme) राबविण्यात येत आहे.या योजनेची अंमलबजावणी केंद्रिय छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघामार्फत करण्यात येत आहे.

समभाग निधी योजनेची वैशिष्टये:

शेतकरी उत्पादक कंपनीची व्यवहार्यता वाढवून ती टिकवून ठेवण्याबरोबरच उत्पादक कंपनीची पत योग्यता वाढविणे आणि सभासदांच्या समभाग (शेअर) रकमेत वाढ करुन त्यांची कंपनीतील सहभागातून मालकी वाढविणे या प्राथमिक उद्दिष्ट पूर्तीसाठी ही योजना सुरु करण्यात आले आहे.

## समभाग निधी योजनेसाठी उत्पादक कंपनीच्या पात्रतेचे निकष:

समभाग निधी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी ही नोंदणीकृत असणे आवश्यक असून शेतकरी भागधारकांची संख्या ५० पेक्षा कमी नसावी. सर्व सभासदांकडून भाग भांडवल गोळा केलेले असावे. उत्पादक कंपनीच्या उपविधी (Bylaws) अन्वये या कंपनीमधील वैयक्तिक भरणा केलेले समभाग रु.३० लाखापेक्षा जास्त नसावा तसेच उत्पादक कंपनीमधील एकूण समभागाच्या किमान ३३ टक्के समभाग धारक हे अल्प,अत्यल्प शेतकरी असावेत. उत्पादक कंपनीच्या संचालक मंडळा व्यतिरिक्त (संस्था सभासदाशिवाय) इतर कोणत्याही वैयक्तिक सभासदाचे समभाग हे उत्पादक कंपनीच्या एकूण समभागाच्या ५ टक्क्यापेक्षा जास्त नसावेत त्याचप्रमाणे उत्पादक कंपनीमधील संस्था सभासदाचे समभाग हे कंपनीच्या एकूण समभागाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नसावे.शेतकरी उत्पादक कंपनीचे निवडून आलेले व्यवस्थापकीय संचालक मंडळ असणे अनिवार्य असून सदर संचालक मंडळावर सर्व शेतक-यांचे प्रतिनिधीत्व करणारे किमान ५ सदस्य व त्यामध्ये किमान एक महिला प्रतिनिधी असणे आवश्यक असेल.शेतकरी उत्पादक कंपनीने पुढील १८ महिन्याचे शाश्वत महसूलावर आधारीत व्यवसाय आराखडा निश्चित केलेला असावा.उत्पादक कंपनीचे बँकेत खाते असणे आवश्यक असून उत्पादक कंपनीचे किमान एक वर्षाच्या खर्चाचे लेखापरीक्षण हे सनदी लेखपालाकडून केलेले असावे.शेतकरी उत्पादक कंपनीने या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

## समभाग निधी योजनेचे फायदे:

पात्रताधारक शेतकरी उत्पादक कंपनीस त्यांच्या एकूण समभागा एवढा निधी या योजनेखाली मिळण्यास मदत होते तसेच नोंदणीकृत झालेल्या शेतकरी उत्पादक कंपन्या ज्यांचे भागभांडवल अर्ज केलेल्या तारखेस जास्त नाही अशा कंपन्यांना प्राधान्य देण्यात येते त्यामुळे अशा कंपन्यांचे भांडवली पत विस्तारण्यास मदत होते.समभाग निधी हा शेतकरी उत्पादक कंपनीच्या सभासदाने धारण केलेल्या समभागा इतकाच असतो व त्याची कमाल रक्कम रु.१० लाख प्रति शेतकरी उत्पादक कंपनी इतकी असते. तसेच समभाग निधी रोखीने जमा करण्यात येतो.मंजूर केलेल्या समभाग निधीची रक्कम ही थेट शेतकरी उत्पादक कंपनीच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते. समभाग निधीची रक्कम प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसाच्या आत शेतकरी उत्पादक कंपनीने त्या रकमेचे अतिरिक्त समभाग हे भारधारकांना वर्ग करणे अनिवार्य असते.

## समभाग निधीची अधिकतम रक्कम:

भागधारकांच्या वर्गवारीनुसार प्रत्येकास प्राप्त होणारी समभाग निधीची अधिकतम रक्कम ही वैयक्तिक भाग धारकास रु.१०००/- आणि वैयक्तिक भाग धारकाचा गट/समुह (उदा.स्वंयसहाय्यता गट/शेतकरी गट) यांना

एकूण सभासद संख्याप्रमाणे प्रती समभाग (शेअर) रु.१०००/- आणि जास्तीत जास्त रक्कम रु.२०,०००/- पर्यंत असेल. संस्थात्मक भागधारक (उदा.शेतकरी उत्पादक कंपनी) त्यांचेसाठी रु.१.०० लाख एवढे असेल.

### समभाग निधी योजनेचे कमाल हप्तेः

- शेतकरी उत्पादक कंपनीस समभाग भांडवलाची रक्कम ही कमाल दोन हप्त्यात काढता येते. पहिला हप्ता अर्ज केल्यापासून २ वर्षाच्या आत आणि कमाल मर्यादा रु.१०.०० लाख प्रती शेतकरी उत्पादक कंपनी आहे..
- जर शेतकरी उत्पादक कंपनीने पहिल्या हप्त्यात रु.१०.०० लाखापेक्षा कमी भाग भांडवल घेतले असेल,पण उत्पादक कंपनीने आपली सभासदांची संख्या वाढवून भांडवल कमाल मर्यादा रु.१० लाख इतके उभे केल्यास दुस-या हप्त्यासाठी केलेला अर्ज हा नवीन अर्जाप्रमाणे गृहित धरला जातो व त्याप्रमाणे सर्व प्रक्रिया पुन्हा करावी लागते.

### समभाग निधी वाटप कार्यपध्दतीचे निकषः

प्रत्येक भाग धारकास एक समभाग प्राप्त व्हावा यासाठी भाग धारकांच्या चालू भाग भांडवलाच्या प्रमाणात समभाग वाटप करण्यात येते. परंतू मंजूर समभाग निधीची रक्कम ही जर सर्व भागधारकास किमान एक समभाग मिळण्या इतकी अपुरी असल्यास समभाग निधीचे वाटप हे समभाग धारकाच्या चालू जमीन धारणे एवढे करावे लागते, परंतु त्यासाठी कमीत-कमी जमीन धारकाच्या वाटपापासून सुरुवात करण्यात यावी. याासाठी पारदर्शक पध्दतीचा अवलंब करावा की ज्यामुळे भाग धारकाची ओळख अगोदर कळणार नाही.

### समभाग निधीसाठी अर्ज प्रक्रियाः

पात्रता धारक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी समभाग निधीच्या सहाय्यासाठी विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.आवश्यक कागदपत्रांची माहिती पुढिलप्रमाणे आहे.

- सनदी लेखापाल यांनी तपासून प्रमाणित केलेली समभाग धारक व त्यांचे भागभांडवलासह यादी.
- शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालक मंडळाचा समभाग निधी योजनेत सहभाग नोंदविण्याबाबतचा मंजूर ठराव.
- भागधारकांची संमती,यामध्ये भागधारकाचे नांव,लिंग,त्यांचे एकूण भागभांडवलाचे दर्शनी मूल्य,जमीन-धारणा या माहितीसह छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघास देण्यात आलेली संमती,त्यामध्ये कंपनीमध्ये भाग धारकांच्या भाग भांडवला इतक्या रकमेचे अतिरिक्त समभाग निधी हे कंपनीच्या खात्यावर जमा करुन वैयक्तिक भागधारकास मिळणेबाबत माहितीचा समावेश असेल.त्याचप्रमाणे नियमाप्रमाणे कंपनीतून बाहेर पडणे किंवा समभाग हस्तांतरीत करणेबाबतच्या प्रक्रियेची माहिती असावी.
- सनदी लेखापाल यांचेकडून तपासून प्रमाणित केलेले कंपनीच्या नोंदणी झालेल्या वर्षापासून सर्व वर्षाचे खर्चाचे लेखापरीक्षण केलेले लेखा तपासणी अहवाल हे सादर करणे आवश्यक.
- ज्या बँकेच्या शाखेत शेतकरी उत्पादक कंपनीचे बँक खाते उघडण्यात आलेले आहे अशा बँकेच्या व्यवस्थापकाकडून प्रमाणित करण्यात आलेले बँकेच्या खाते पुस्तकातील एकूण मागील महिन्यांच्या नोंदीची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल.

- नोंदणीकृत कंपनीचा व्यवसाय आराखडा व पुढील १८ महिन्यांच्या अंदाजपत्रकाची माहिती सादर करणे आवश्यक असेल.
- समभाग निधी योजनेअंतर्गत संचालक मंडळाने स्वाक्षरी व अंमलबजावणीसाठी शेतकरी उत्पादक कंपनीने प्राधिकृत केलेले संचालक यांची सविस्तर माहिती ज्यामध्ये त्यांचे नांव,छायाचित्र,ओळखीचा पुरावा (यासाठी शिधापत्रिका,आधार कार्ड,निवडणूकपत्र,पारपत्र याचा समावेश आहे) सादर करणे आवश्यक राहील.
- अर्जासोबत सादर करण्यात आलेल्या सर्व दस्तऐवजांच्या सर्व पृष्ठांवर किंमान दोन संचालक मंडळाचे सदस्य/कंपनीचे प्रतिनिधी यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.
- शेतकरी उत्पादक कंपनीने त्यांची पत विश्वाससार्हता शाश्वतता व उत्पादकता निर्धारीत करण्यासाठी त्यांचे प्रशासकीय बाबी, व्यवसाय आराखडयाची उत्पादन क्षमता,व्यवस्थापकीय क्षमता व वित्तीय शिस्त याचा विचार करुन समभाग निधी योजनेअंतर्गत अर्ज सादर करावा.
- वरील बाबींची सत्यता व विश्वाससार्हता ही योजनेअंतर्गत समभाग निधी अर्थ सहाय्य मिळविण्यासाठी सादर करण्यात आलेल्या कागदपत्राच्या आधारे,प्रत्यक्ष भेटीतून व पुरस्कर्त्या संस्थेच्या माध्यमातून पडताळून पाहण्यात येते.

**समभाग निधी योजने अंतर्गत सहाय्य मंजूरी:**

- मंजूर झालेली समभाग निधीची रक्कम प्राप्त झाल्यानंतर शेतकरी उत्पादक कंपनीने समभाग निधीच्या प्रमाणात प्राप्त झालेले अधिकचे समभाग हे ४५ दिवसांतपर्यंत समभागधारकांच्या नावावर जमा करणे आवश्यक असेल.
- शेतकरी उत्पादक कंपन्यांनी समभाग निधी अंतर्गत प्राप्त झालेली रक्कम ही भागधारकाच्या नावे जमा केल्याचे प्रमाणपत्र छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघाला कळविणे आवश्यक राहील.
- शेतकरी उत्पादक कंपनीशी झालेल्या कराराअन्वये छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघ,नवी दिल्ली हे भागधारकांच्या खात्यावरील समभाग निधीची माहिती तपासू शकते.
- शेतकरी उत्पादक कंपनीने छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघ यांचेबरोबर लेखी करार केल्यानंतरच समभाग निधी योजने अंतर्गत अर्थसहाय्य वितरण करण्यात येईल.
- याबाबत कोणत्याही मर्यादेचे उल्लंघन किंवा करारनाम्यातील अटी व शर्तींचे अनुपालन न केल्यास छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघ हे समभाग निधी योजनेची रक्कम परत मागावू शकते व ते कंपनीवर बंधनकारक राहील. छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघ योजनेच्या मर्यादेत कायदेशीर कारवाई करु शकेल.

**निधी वितरण:**

- मंजूरीच्या अटी स्विकारल्यानंतर/मान्य केल्यानंतर शेतकरी उत्पादक कंपनी छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघांशी करारबध्द होईल.
- छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघ मंजूर निधीची ही रक्कम शेतकरी उत्पादक कंपनीच्या बँक खात्यावर जमा करील.

**पडताळणी** :

अनुपालन व पडताळणीसाठी शेतकरी उत्पादक कंपनी छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघ यांना पुढील दस्ताऐवज सादर करणे आवश्यक आहे.

- शेतकरी उत्पादक कंपनीने समभाग निधी योजने अंतर्गत त्यांच्या भागधारकांच्या नांवे जमा केलेल्या समभाग निधीसह भाग धारकांची सनदी लेखापाल यांचेकडून तपासून प्रमाणित केलेली त्यांच्या बँक खात्याच्या तपशीलासह यादी.
- शेतकरी उत्पादक कंपनी आपल्या भागधारकास समभाग निधी योजनेअंतर्गत अतिरिक्त समभाग जमा करण्यास किंवा ठरवून दिलेल्या कालमर्यादेत योजनेच्या अंमलबजावणी कराराप्रमाणे नसल्यास छोटया शेतक-यांच्या कृषि व्यापार संघाच्या समभाग निधी योजने अंतर्गत वितरीत केलेला निधी परत घेण्यास किंवा तो रदद करण्यास सक्षम असेल.